# ग्राहक गाऱ्हणे निवारण मंच

(विद्युत कायदा ,२००३ अंतर्गत कलम ४२ (५) अन्वये स्थापित )

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

जळगाव परिमंडळ


दुरध्वनी क्र. ०२५७ – २२७३००४
Email :-cgrfjalgaonzone@gmail.com
cejalgaon@mahadiscom.in.
cgrfjalgaon@mahadiscom.in

ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
जुनी एम.आय.डी.सी.
महावितरण विश्राम गृहाजवळ,
अजिंठा चौफुली जळगाव. ४२५००३


जा.क्रः स.स./ग्रागानिमं/जप/जळगाव मं/०९–२०१८–१९/ № 0 0 0 6 4 दिनांकः 27 DEC 2018

(रजिष्टर पोच व्दारे)

गाऱ्हाणे दाखल दिनांक : १९/१०/२०१८
निकाल दिनांक : २१/१२ /२०१८

प्रति,

१. श्री साई ॲग्रो इंडस्ट्रीज,,
प्लॉट नं.डी-५६/१,
एम.आय.डी.सी एरिया, जळगाव
ता.जि.जळगाव.पिन-४२५००३
(ग्रा.क्र.११००१३११९६५१) } तक्रारदार

२. नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
म रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
मंड्ळ कार्यालय,जळगाव.

३. कार्यकारी अभियंता
म रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
विभागिय कार्यालय,जळगाव. } विज वितरण कंपनी

(सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या.,जळगांव, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच)

## निर्णयपत्र

श्री साई ॲग्रो इंडस्ट्रीज, प्लॉट नं.डी-५६/१, एम.आय.डी.सी एरिया, जळगाव ता.जि. जळगाव. हे विज वितरण कंपनीचे व्यावसायीक प्रवर्गातील (LT-Comm) प्रवर्गातील ग्राहक आहेत. महावितरण कंपनीकडे कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी करुन मिळण्याबाबत योग्य ते आदेश पारीत करावेत व इतर अनुषंगिक न्यायोचित आदेश होण्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन मिळण्याविषयी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली. मात्र अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडुन दिलेला निकाल ग्राहकास मान्य नसल्यामुळे त्यांनी आपले गाऱ्हाणे अनुसुची "अ" मध्ये मंचाकडे सादर केले. ते मंचाकडे दि १९.१०.२०१८ रोजी नोंदविण्यात आले.

त्यानुसार मंचाचे अध्यक्ष ,सदस्य-सचिव व सदस्य यांनी आपसात सल्लामसलत करुन हे प्रकरण सुणावणीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर गाऱ्हाण्याची सुणावनी दि.०७.१२.२०१८ रोजी घेण्यात आली. या संबंधीची सुचना तक्रारदार ग्राहक व वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्यांना दि.२७.११.२०१८ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली. याच पत्रासोबत तक्रार अर्जाची प्रत नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता मंडळ कार्यालय जळगाव यांना देवुन तक्रार अर्जानुसार मुद्देनिहाय अभिप्राय १५ दिवसाच्या आत मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोचविण्याबाबत सुचित करण्यात आले.

सुनावणीस विद्युत वितरण कंपनीच्या जळगाव मंड्ळ कार्यालयाकडुन नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता प्रशासन श्री शिवाजी बी. भालशंकर हे उपस्थित होते. तसेच ग्राहकाच्या वतीने ग्राहक प्रतिनिधी श्री. सचिन एन.चोरडिया हे उपस्थित होते.

Scanned by CamScanner

**ग्राहकाची बाजु :-**

१. आम्ही २०१ एच.पी चे औद्योगिक ग्राहक असुन नियमितपणे वीजदेयके भरत आहोत.
२. दि.१४.०५.२०१८ रोजी ऑनलाईन पद्ध्तीने आम्ही कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी करण्यासाठी अर्ज केलेला होता.
३. परंतु दि.१८.०६.२०१८ पावेतो वीज देयकामध्ये आमची कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी झालेली नव्हती.
४. तदनंतर आम्ही अंतर्गत गाऱ्हाणे निवारण मंचाकडे दि.१९.०६.२०१८ रोजी आमचे गाऱ्हाणे निवारण करुन मिळावे यासाठी अर्ज दाखल केला.
५. दि.१०.०८.२०१८ रोजी आमच्या गाऱ्हाणेबाबत सुनावणी घेण्यात येवुन निर्णय राखीव ठेवण्यात आला.
६. दि.०८.१०.२०१८ रोजी आम्हाला अंतर्गत गाऱ्हाणे निवारण कक्षाचा आदेश प्राप्त झाला परंतु त्यामध्ये कॉन्ट्रॅक्ट डिमांड सोबत कनेक्टेड लोड सुध्दा कमी करण्याचे आदेश पारीत करण्यात आला.
७. त्यामुळे आमचे गाऱ्हाणे फ़क्त कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी करण्याबाबत होते.

**ग्राहकाच्या मागण्या :-**

१. आमची कॉन्ट्रॅक्ट डिमांड माहे जुन -२०१८ पासुन कमी करुन जास्तीचे घेण्यात आलेले स्थिर आकार देय असलेल्या व्याजासह पुढील वीज देयकामध्ये वजावट करुन मिळावे.

**वितरण कंपनीची बाजु :- (लेखी निवेदनानुसार)**

वितरण कंपनीचे संबंधीत मंड्ळ कार्यालयाचे नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(प्रशासन), जळगाव यांनी त्यांचे पत्र क्र.००६८१५ दि.१७.११.२०१८ अन्वये पत्रव्यवहार मंचापुढे सादर केला त्यात त्यांनी त्यांची बाजु खालील प्रमाणे मांडलेली आहे.

उपरोक्त विषयास अनुसरुन, ग्राहक यांनी इलेक्ट्रीसिटी ॲक्ट २००३ अन्वये अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, मंड्ळ कार्यालय जळगाव यांच्याकडे दि.१९.०६.२०१८ रोजी तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज दाखल केल्यानुसार अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, मंड्ळ कार्यालय जळगाव येथे दि.१०.०८.२०१८ रोजी सदर तक्रारीची सुनावणी घेण्यात आली होती.

मे.साई ॲग्रो इंडस्ट्रीज, डि-५६/१ एम.आय.डी.सी. जळगाव ग्रा.क्र. ११००१३११९६५१ कॉन्ट्रॅक्ट डिमांड मध्ये बदल करण्याकरीता अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, मंड्ळ कार्यालय जळगाव यांचे कडे अर्ज केला होता. सुनावणी दरम्यान मे.साई ॲग्रो इंडस्ट्रीज, डि-५६/१ एम.आय.डी.सी. जळगाव ग्रा.क्र. ११००१३११९६५१तसेच महावितरण कंपनी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने खालीलप्रमाणे निष्कर्ष काढुन दि.१५.०९.२०१८ रोजी सदर तक्रार निकाली काढली होती.

मे.साई ॲग्रो इंडस्ट्रीज, डि-५६/१ एम.आय.डी.सी. जळगाव ग्रा.क्र. ११००१३११९६५१ दि.१९.०६.२०११ रोजी दिलेल्या कागदपत्रांवरुन असे निदर्शनास येते की, त्यांची सद्यस्थितीत कॉन्ट्रॅक्ट डिमांड १५०के.व्ही.ए असुन सदर कॉन्ट्रॅक्ट डिमांड ९० के.व्ही.ए करण्याकरीताचा त्यांचा अर्ज आहे. सदर बाबतीत खालील प्रमाणे के.व्ही.ए. च्या रेशोमध्ये के.ड्ब्ल्यु वाढविणे किंवा कमी करणे परिपत्रकानुसार गरजेचे आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग केस.नं. १९५-२०१७

**Contract Demand :-**

Contract Demand means the demand in Kilo-Watt (KW) or Kilo-Watt-Ampeares (KVA), Mutually agreed between the distribution licensee and the consumer as entered in to the agreement or agreed through other written communication (for Conversion of KW into KVA, the power Factor of ०.८० shall be applied.)

कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी करावा आणि त्या रेशोमध्ये कनेक्टेड लोड कमी करावा.

**त्यावर मंचाने नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(प्रशासन), जळगाव यांना विस्त्रृत पणे खुलासा विचारला असता त्यांनी Power Factor Maintain करण्यासाठी Contract Demand सोबत त्याच प्रमाणात Connected Load कमी करावाच लागतो असे सुनावणी दरम्यान नमुद केले.त्यानंतर त्यांनी वितरण कंपनीचे संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय जळगाव यांनी त्यांचे पत्र क्र.५३०३ दि.२२.११.२०१८ अन्वये सादर केलेला खुलासा मंचापुढे वाचुन दाखविला. त्यात त्यांनी त्यांची बाजु खालील प्रमाणे मांडलेली आहे.**

वरील संदर्भित विषयास अनुसरुन, मी कार्यकारी अभियंता जळगाव शवग्रा विभाग सदरील केस क्र.९/२०१८/१९ मे.साई ॲग्रो इंडस्ट्रीज, डि-५६/१ एम.आय.डी.सी. जळगाव ग्रा.क्र.११००१३११९६५१ उपलब्ध दस्तएवजानुसार खालिलप्रमाणे खुलासा अवगत करीत आहे.

महावितरणमध्ये औद्योगिक दरसंकेत हे प्रामुख्याने KW/HP वर आधारीत आहे. त्यास अनुसरुण इतर वाणिज्य दर निश्चित होत असतात, त्यास धोरणात्मक निर्णयानुसार शासन व महाराष्ट्र विज नियामक आयोग यांची मान्यता असते.

Scanned by CamScanner

संबंधित ग्राहकाने दि.१२.१२.२०११ रोजी महावितरण कंपनी नियमास अनुसरुण, विद्युत पुरवठा निश्चित करुन त्याचा वापर आजतागायत करीत आहे.सर्व सामान्यत: दर संकेतातील शर्ती व नियम यास अनुसरुण औद्योगिक ग्राहकास विद्युत बिले ही संगणकीय प्रणाली माध्यमातुन तयार केली जातात.

१. सदरील ग्राहकाचा अश्वशक्ती भार हा २०१ असा आहे. त्यास अनुसरुण १५० KVA असा कॉन्ट्रॅक्ट डिमांड निश्चित आहे.
२. अंतर्गत ग्राहक निवारण कक्ष, जळगाव यांनी दि.१५.०९.२०१८ रोजी दिलेल्या निर्णयात कॉन्ट्रॅक्ट डिमांडसह कनेक्टेड लोड कमी करण्यात यावा. यात महाराष्ट्र विज नियामक आयोग केस क्रमांक १९५/२०१७ चा आधार घेतला आहे.
३. सदरील ग्राहकास केवळ कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी करुन पाहिजे, याची तरतुद सद्यस्थितीत आमच्या दर संकेतामध्ये स्पष्टपणे नमुद नाही.

***थोडक्यात ग्राहकास कनेक्टेड लोड हा जसा आहे तसाच हवा असुन बील सुध्दा KWH प्रमाणे मागणी करीत आहे. ही बाब दरसंकेता विरुध्द असल्याने त्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे बीले दुरुस्त करता येत नाही. सदरील खुलासा दिला असे.***

त्यानंतर नोडल अधिकारी यांनी केलेल्या विनंती नुसार याच विषयी सादर केलेल्या खुलाशासोबत स्वयंपुर्ण दस्तावेज सादर करण्यास दि.१३.१२.२०१८ पर्यंत वेळ देण्यात आली. त्यावेळी ग्राहक प्रतिनीधी यांनी त्यास संमती देत, आमची बाजु स्वयंस्पष्ट असुन, महावितरणने दिलेल्या नवीन खुलाशावर त्यांना त्याचा कोणताही अतिरीक्त खुलासा करावयाचा नसुन अतिरीक्त वेळ न घालवता मंचाने निर्णय द्यावा अशी विनंती केली.

**त्यानंतर महावितरण कंपनीचे संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय जळगाव यांनी रोजनाम्यात नमुद केल्याप्रमाणे त्यांचा खुलासा त्यांचे पत्र क्र.०५५९३ दि.१३.१२.२०१८ अन्वये पत्रव्यवहार मंचापुढे सादर केला त्यात त्यांनी त्यांची बाजु खालील प्रमाणे मांडलेली आहे.**

वरील संदर्भित विषयास अनुसरुन, केस क्र.९/२०१८/१९ मे.साई ॲग्रो इंडस्ट्रीज, डि-५६/१ एम.आय.डी.सी. जळगाव ग्रा.क्र.११००१३११९६५१ उपलब्ध दस्तएवजानुसार खालिलप्रमाणे खुलासा अवगत करीत आहे.

संबंधित ग्राहकाने दि.१२.१२.२०११ रोजी महावितरण कंपनी नियमास अनुसरुण, विद्युत पुरवठा घेतलेला आहे व त्याचा वापर आजतागायत करीत असुन ग्राहक क्रमांक ११००१३११९६५१असा आहे.

ग्राहकाने या पुर्वी मा. अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष मंड्ळ कार्यालय जळगाव येथे तक्रार दाखल केलेली होती. संदर्भ क्र.२ नुसार निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आहे.

महावितरणमध्ये लघुदाब औद्योगिक दरसंकेत (टॅरीफ़) हे प्रामुख्याने KW/HP वर आधारित आहे. त्यास अनुसरुन इतर वाणिज्य दर (टॅरिफ़ रेट) निश्चित होत असतात, त्यास धोरणात्मक निर्णयानुसार शासन व महाराष्ट्र विज नियामक आयोग यांची मान्यता असते.

सर्व सामान्यत: दर संकेतातील शर्ती व नियम यास अनुसरुण औद्योगिक ग्राहकास विद्युत बिले ही संगणकीय प्रणाली माध्यमातुन तयार केली जातात.

१. सदरील ग्राहकाचा अश्वशक्ती भार हा २०१ असा आहे. त्यास अनुसरुण १५० KVA असा कॉन्ट्रॅक्ट डिमांड निश्चित आहे.
२. अंतर्गत ग्राहक निवारण कक्ष, जळगाव यांनी दि.१५.०९.२०१८ रोजी दिलेल्या निर्णयात कॉन्ट्रॅक्ट डिमांडसह कनेक्टेड लोड कमी करण्यात यावा. यात ग्राहकाने महाराष्ट्र विज नियामक आयोग केस क्रमांक १९५/२०१७ व वाणिज्य परिपत्रक क्र.१०१ व १०४ चा आधार घेतलेला आहे.
३. सदरील ग्राहकास केवळ कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी करुन देणेबाबतची स्पष्ट तरतुद सद्यस्थितीत महावितरणच्या दर संकेतामध्ये (टॅरिफ़ सर्क्युलर) नमुद नाही. ग्राहकाची कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी केल्यास त्याच्या गुणोत्तरानुसार कनेक्टेड लोड कमी होतो परंतु सदर बाब ग्राहकास मान्य नाही.

थोडक्यात ग्राहकास कनेक्टेड लोड हा जसा आहे तसाच हवा असुन फ़क्त कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी करुन बील सुध्दा KWH प्रमाणे मागणी करीत आहे.

मा. अंतर्गत ग्राहक निवारण कक्ष, मंडळ कार्यालय जळगाव यांचे आदेशाप्रमाणे ग्राहकाला कॉन्ट्रॅक्ट डिमांड ही कनेक्टेड लोडसह कमी करण्यास विभागिय कार्यालय तयार आहे.

सदरील खुलासा मा.मंचाने ग्राह्य धरुन पुढील आदेशास्तव सविनय सादर.

**<u>अंतर्गत तक्रार निवारण कक्षाची कार्यवाही :-</u>**

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंड्ळ कार्यालय, जळगाव अंतर्गत सुनावणी घेण्यात आली त्यावर खालील प्रमाणे निर्णय देण्यात आलेला आहे.

१. *वरील निर्देशासह सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे..*
२. *कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी करावा व रेशो प्रमाणे कनेक्टेड लोड कमी करावा.*

Scanned by CamScanner

**मंचाचे निष्कर्ष :-**

तक्रारदाची तक्रार, दाखल कागदपत्रे विजवितरण कंपनीचे म्हणने व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की,

१. ग्राहकाने दि.१४.०५.२०१८ रोजी Contract Demand कमी करण्यासाठी केलेल्या अर्जानुसार महावितरणच्या सक्षम अधिकाऱ्यांनी त्याबाबत विहीत वेळेत योग्य ती कार्यवाही न केल्याने ग्राहकास अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडळ कार्यालय, जळगाव यांचे कडे दाद् मागावी लागली.
२. सुनावणी दरम्यान व त्यानंतर महावितरण कंपनीच्या वतीने बाजु मांडतांना Contract Demand सोबत Connected Load त्याच प्रमाणात कमी करणे आवश्यक असल्याचे नमुद करुन त्यासाठी सादर करण्यात आलेल्या स्वयंपुर्ण दस्तावेजामध्ये सदर बाबीचा उल्लेख कोठेही दिसुन आला नाही. **तसेच नोडल अधिकारी यांनी Power Factor Maintain करण्यासाठी Contract Demand सोबत Connected Load त्याच प्रमाणात कमी करावाच लागतो ही बाब अनाकलनीय होती.**
३. वरील बाबी वरुन स्पष्ट होत की, ग्राहकाने दि.१४.०५.२०१८ रोजी Contract Demand कमी करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जावर विहीत वेळेत कार्यवाही न करता प्रकरण प्रलंबित ठेवण्याइतपत कोणतेही सबळ कारण महावितरणला देता आले नाही.
४. त्यामुळे, ग्राहकास त्यानी केलेल्या अर्जापासुन पुढील बिलींग सायकल पासुन सुधारित Contract Demand प्रमाणे बिल दुरुस्ती करुन फ़रकाची रक्कम महावितरण कंपनीचे नियमानुसार व्याजासह ग्राहकास देण्यात यावी.
५. कोणत्याही सबळ कारणाशिवाय प्रकरण प्रलंबित ठेवल्याबाबत सखोल चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यावर SOP प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ग्राहकाचे प्रतिनिवेदन, विद्युत वितरण कंपनीचा खुलासा व सादर करण्यात आलेली कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करुन मंच या प्रकरणी खालील निर्णय देत आहे.

## निर्णय

१. ग्राहकास त्यानी केलेल्या अर्जापासुन पुढील बिलींग सायकल पासुन सुधारित Contract Demand प्रमाणे बिल दुरुस्ती करुन फ़रकाची रक्कम महावितरण कंपनीचे नियमानुसार व्याजासह ग्राहकास देण्यात यावी.
२. कोणत्याही सबळ कारणाशिवाय प्रकरण प्रलंबित ठेवल्याबाबत सखोल चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यावर SOP प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.
३. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील विनियम क्र.६.१२ नुसार नोडल अधिकारी यांनी या आदेशाची पूर्ततेचा व आदेशातील दखल पात्र निष्कर्ष यावरील कार्यवाहीचा अहवाल मंचाकडे एक महिन्यात सादर करावा.
४. निर्देशित कालावधीत वितरण कंपनीने या आदेशाची अंमलबजावणी न केल्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील विनियम क्र.२२ अन्वये तक्रारदार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागु शकतात.
५. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र.१७.२ नुसार मा. विद्युत लोकपाल यांचेकडे, (द्वारा-महाराष्ट्र वीज नियामक आयोग, ६०६ केशवा बंगला, बांद्रा कॉम्पलेक्स (पुर्व) मुंबई-४०००५१) येथे या आदेशाच्या दिनांकापासुन ६० दिवसाच्या आत ते अपील करु शकतात.

—सही—
**(विजयानंद संपतराव काळे)**
**सदस्य-सचिव तथा कार्यकारी अभियंता**

—सही—
**(चंद्रकांत मोहन येशीराव)**
**सदस्य.**

—सही—
**(डॉ भास्कर गोविंदा पालवे.)**
**अध्यक्ष**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१. मुख्य अभियंता,मरा.वि.वि.कं.(मर्या), विद्युत भवन, परिमंड्ळ कार्यालय, जळगाव.
२. अधिक्षक अभियंता, मरा.वि.वि.कं.(मर्या)मंडळ कार्यालय,जळगाव.

सदस्य–सचिव / कार्यकारी अभियंता
म.रा.विज वितरण कंपनी मर्यादित
ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
जळगांव परीमंडळ,जळगांव

Scanned by CamScanner